राष्ट्रीय शिक्षण धोरणातून सक्षम व सृजनशील भारत घडेल: उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील >>पान 2

'बजाज पुणे ग्रँड टूर २०२६' केवळ स्पर्धा नसून पुढील पिढ्यांसाठी टिकणारा वारसा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >>पान 3

वारकरी संस्कारातून घडलेले समाजभान : आपुलकी व सेवाभावाचा आदर्श रुपेश पाटील बाजड >>पान 4

**सुविचार**

राग जाळा नाही तर तो तुम्हाला जाळेल. – अज्ञात


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 162 ■ रविवार, दि. 18 जानेवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




30000 कोटी मालमत्तेतील वाद शिगेला? करिष्मा कपूरला दोन आठवड्यात खुलासा करण्याचे न्यायालयाकडून आदेश


आतील पान

# महापालिकांचा निकाल तर लागला, आता नवीन महापौरपदासाठी आरक्षण सोडत कधी?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** २९ महापालिका निवडणुकांचे निकाल १६ तारखेला जाहीर झाले. त्यात बहुतांश महापालिकेत महायुतीतील पक्ष सरस ठरले. निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर आता सर्वांच्या मनात एकच प्रश्न आहे की, नवा महापौर नेमका कधी आणि कसा निवडला जाणार? याबाबतची नावं कधी समोर येणार? महापौर कोण होणार यासाठी सोडतीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच राजकीय पक्षांकडून उमेदवार ठरवला जातो. महापौर निवडीसाठी सोडतीची प्रक्रिया राज्य सरकारकडून केली जाते. त्यासंदर्भातील अधिसूचना निघाल्यानंतरच ही प्रक्रिया सुरू होईल.

महापालिकांच्या महापौरांची निवड थेट जनतेतून होत नाही. त्यासाठी एक विशिष्ट निवड प्रक्रिया पार पाडली जाते. नगरविकास विभागाकडून महापौर पदासाठी आरक्षणाची सोडत काढण्यासाठी नोटीफिकेशन काढलं जातं. त्यानुसार सर्व महापालिकेतील महापौर पदासाठी सोडत काढण्यात येते. या सोडतीमध्ये खुला प्रवर्ग, राखीव, महिला अशा प्रकारच्या वर्गांचा समावेश असतो. ज्या ठिकाणी जी सोडत निघते त्यानुसार महापौर पदाची निवड केली जाते. जसं मुंबईत ज्या पक्षाकडं किंवा युतीकडं ११४ पेक्षा जास्त नगरसेवक आहेत, त्यांचाच महापौर निवडला जातो. हे पद खुल्या प्रवर्गासाठी आहे की राखीव, हे या सोडतीवरून स्पष्ट होईल. त्यानंतर महापौर आणि उपमहापौर पदासाठी अर्ज भरले जातात आणि महापालिकेच्या सभागृहात




मतदान होऊन नव्या महापौरांची घोषणा केली जाते.

ही अधिसूचना पुढच्या आठवड्यात काढण्यात येणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. ही अधिसूचना काढल्यानंतर सोडतीची प्रक्रिया जानेवारी अखेरपर्यंत होईल असं काही नेत्यांकडून खासगीत सांगितलं जात आहे. त्यानंतर महापौर पदासाठी नावे दिली जातील. या प्रक्रियेमुळं अद्याप कोणत्याही पक्षात महापौर पदासाठी कोणतंही नाव समोर आलं नाही. आम्ही एकनाथ शिंदेंशी महापौर निवडीबाबत चर्चा करू आणि त्यानंतर निर्णय होईल. वाद होईल असं काही होणार नाही. शिवसेनेच्या काही जागा खूप कमी मतांनी गेल्या. त्यानुसार त्यांची कामगिरी चांगली राहिली आहे. – देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

"मुंबईत महायुतीचा महापौर होणार तर ठाण्यात शिवसेनेला स्पष्ट बहुमत आहे." असं एकनाथ शिंदेंनी भाषणात बोलताना सांगितलं. मुंबईत सत्ता स्थापन करताना भाजपाला शिवसेनेची गरज भासणार आहे. पण ठाण्यात शिवसेनेला स्पष्ट बहुमत असल्यानं भाजपाची मदत न घेता महापौर शिवसेनेचाच होणार असल्याचं अप्रत्यक्षपणे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.

ठाण्यात शिवसेनेला एकहाती सत्ता मिळाली आहे. "आम्हाला योग्य मान सन्मान न मिळाल्यास वेगळा विचार करू. वेळ पडल्यास विरोधी बाकावर बसू," असं वक्तव्य भाजपाचे ठाण्याचे आमदार संजय केळकर यांनी केलं. महापौर पदासाठी ही रस्सीखेच बघायला मिळाली असली तरी, निवडणुकीआधी ईटीव्ही भारतला दिलेल्या मुलाखतीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापौर निवडताना संख्याबळ हा निकष नसून महायुतीतील मित्रपक्षांशी चर्चा करूनच महापौर पदाचा निर्णय घेतला जाईल, असं सांगितलं होतं. त्यामुळं महापौर पदासाठी रस्सीखेच सुरू झाली असली तरी, या प्रक्रियेमुळं महापौर निवडीला अजून काही दिवस लागण्याची शक्यता आहे.

## पुण्यातील दारुण पराभवानंतर अजितदादा सकाळीच शरद पवारांना भेटले, दीड तास खलबतं, पुढचा प्लॅन ठरला?



**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :**पुण्यासह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये भाजपला रोखण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) हे दोन पक्ष एकत्र आले. या निवडणुकीत भाजप विरुद्ध राष्ट्रवादी असाच प्रचाराचा दिसत होता. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपच्या पालिकेतील कारभारावर प्रचारा टीका केली होती. अजित पवार यांनी जाहीरनाम्यात मोफत मेट्रो, पीएमपी बस देण्याची घोषणा केली होती. या घोषणेवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधीच प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. "घोषणा करायला तुमच्या बापाचं काय जातं," आणि मोफत योजनेवरून खिशात नाही आणा, मला बाजीराव म्हणा, अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. त्यावर भाजपने पालिकेच्या तिजोरीत आणा ठेवला नाही. मी बाजीराव आहेच, असे प्रतिउत्तर दिले होते, पण राष्ट्रवादी काँग्रेसला अवघ्या ३० जागा मिळाल्या, त्यामुळे घडळ्याचे काटे उलटे फिरले. हा निकाल अजित पवार यांच्या राजकीय वर्चस्वाला बसलेला मोठा धक्का आहे. तर आता पुन्हा नव्या दमानं उतरण्यासाठी आज या पक्षातील मुख्य नेत्यांची बैठक पार पडल्याची माहिती आहे.




## अमरावती महापालिका निवडणूक निकाल; आकड्यांच्या पलीकडचं राजकारण, भाजपासाठी आत्मपरीक्षणाची वेळ

**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावती महापालिकेचा निकाल हा केवळ ८७ जागांच्या आकड्यांचा खेळ नसून राजकारणातील अंतर्गत विसंगती, निर्णय क्षमतेतील त्रुटी आणि संघटनात्मक व्यवस्थापनातील अपयश उघड करणारा ठरला आहे. २०१७ च्या निवडणुकीत ४५ जागा मिळवणाऱ्या भाजपाला यंदा केवळ २५ जागांवर समाधान मानावं लागलं. विशेष म्हणजे निवडणुकीपूर्वी भाजपाला ५० पेक्षाअधिक जागा मिळतील असं वातावरण होतं. मात्र प्रत्यक्षात निकालानं पक्षाच्या रणनीतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केलाय. सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय विश्लेषक ॲड. धनंजय देशमुख यांनी ईटीव्ही भारत शी बोलताना भाजपाच्या या अधोगती मागील कारणांचा सविस्तर आढावा घेतला आहे. चुकीच्या निर्णय प्रक्रियेविरोधातील




जनतेचा हा स्पष्ट संदेश आहे, अशा शब्दात त्यांनी भावना व्यक्त केल्या आहेत.

या निवडणुकीत अमरावतीच्या जनतेनं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं नेतृत्व नाकारलं नाही. जर नेतृत्वावर अविश्वास असता तर भाजपा आजही सर्वाधिक नगरसेवक निवडून आणणारा पक्ष ठरला नसता. जनतेचा विश्वास आजही आपल्या नेतृत्वावर कायम आहे. मात्र, हा विश्वास स्थानिक पातळीवर योग्य पद्धतीनं मतांमध्ये रूपांतरीत करण्यात अपयश आल्याचं धनंजय देशमुख म्हणाले.

## भिवंडी महापालिकेत काँग्रेसची मुसंडी; पण सत्ता स्थापनेसाठी मोठी कसरत, भाजपकडूनही तगडी फिल्डिंग, महापौर कोणाचा?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** भिवंडी महापालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस मोठा पक्ष म्हणून पुढे आला आहे. परंतु बहुमत कोणत्याही पक्षाला मिळालेला नाहीये. त्यामुळे सत्ता स्थापनेसाठी भाजप आणि काँग्रेस यांच्यासम ोर इतर पक्षांच्या पाठिंब्याची गरज भासणार आहे. यात काँग्रेस ३०, राष्ट्रवादी १२, आणि समाजवादी ६ आल्यास काँग्रेसचा सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा होऊ शकतो,तर समाजवादी पक्षाच्या विरोधात रईस शेख यांनी बंड केला होता आणि राष्ट्रवादी शरद पवार गट व काँग्रेसला मदत केली होती. त्यामुळे समाजवादी सोबत येण्याची शक्यता कमीच असल्याचे बोललं जात आहे. त्यामुळे काँग्रेसपुढे दुसरा पर्याय म्हणजे काँग्रेस ३०, राष्ट्रवादी १२, कोणार्क विकास आघाडी ४ किंवा भिवंडी विकास आघाडी व अपक्ष असे ४ चा पाठिंबा घेत बहुमताचा आकडा मिळवत काँग्रेस सत्तास्थापन करू शकते.

तर दुसरीकडे भाजप देखील आपली सत्ता स्थापन करण्यासाठी मागे राहणार नाहीये. यात भाजप २२ आणि शिवसेना १२ आणि राष्ट्रवादी (एड़) १२ असे एकत्र येत ४६ चा आकडा मिळवत सत्ता स्थापन करू शकते. तर भाजप २२ आणि शिवसेना १२ आणि समाजवादी ६ , कोणार्क विकास आघाडी ४ आणि भिवंडी विकास आघाडी एकता मंच ३ एकत्र येऊन ४७ आकडा गाठून बहुमत मिळवू शकतात. त्यामुळे परिणामी आता नेमकं काय राजकीय गणित जुळतं आणि कुणाचा महापौर विराजमान होतो हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

भिवंडी महानगरपालिकेत मुस्लीम मतदारांची संख्या लक्षणीय आहे. त्यामुळे गेली अनेक वर्षे काँग्रेसने मुस्लीम व्होटबँक आणि पर्यायाने भिवंडी महानगरपालिकेवर वर्चस्व राखले आहे. गेल्या निवडणुकीत काँग्रेसने ९० पैकी ४७ प्रभागांमध्ये विजय मिळवला होता. भिवंडीत पुन्हा एकदा काँग्रेस पक्ष हा मोठा पक्ष म्हणून समोर आला आहे, परंतु २०१७ च्या निवडणुकीत काँग्रेसला बहुमत मिळाले असून ४७ जागा मिळाल्या होत्या परंतु यंदा फक्त ३० जागा वर त्यांना समाधान मानावा लागलं आहे.

## लवकरच बांगलादेशी आणि रोहिंग्यांविरोधात कारवाई होणार, मंत्री नितेश राणेंनी दिली माहिती

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील २९ पैकी २३ महापालिकांवर महायुतीचा झेंडा फडकला आहे. मुंबईसह २१ महापालिकांमध्ये भाजप तर ठाणे आणि कल्याण डोंबिवली मनपात शिवसेना मोठा पक्ष झाला आहे. निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी मुंबईत राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीसाठी आलेल्या मंत्री नितेश राणे यांनी उपस्थित प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. याप्रसंगी मंत्री नितेश राणे यांनी फडणवीस सरकारच्या एका महत्त्वाच्या उपक्रमाची थोडक्यात माहिती दिली.

महापालिकांसाठी प्रचार करताना संकेत दिले होते त्याप्रमाणे लवकरच घुसखोर बांगलादेशी आणि रोहिंग्यांविरोधात कारवाई केली जाईल. अनधिकृत बांधकामांवर बुलडोझर फिरवला जाईल; असे मंत्री नितेश राणे म्हणाले. मुंबईसह राज्यात बेकायदा वास्तव्य करत असलेल्या सर्व घुसखोर बांगलादेशी आणि रोहिंग्यांविरोधात कायद्यानुसार कारवाई होईल; असे नितेश राणे यांनी सांगितले. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी कॅमेरा – माईक घेऊन तयार राहावे. लवकरच कारवाई होताना दिसेल, अशी माहिती मंत्री नितेश राणे यांनी दिली. मतदारांनी मुंबईसह राज्यात विकासकामं करणाऱ्या भाजप महायुतीला भरभरुन मतं दिली आहे. मतदारांचा विश्वास भाजप महायुती सार्थ ठरवेल, असे स्पष्ट संकेत मंत्री नितेश राणे यांनी दिली. मुंबईसह सर्वच शहरांमध्ये



विकासकामांना चालना दिली जाईल. विकासातून प्रत्यक्ष – अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती करण्यावर भर दिला जाईल; अशी माहितीही त्यांनी दिली.

मुंबई महापालिकेत १९९७ पासून एकाच पक्षाची सत्ता आहे. पण उद्धव यांनी सत्ता हाती असताना विकासाऐवजी भलत्याच कामांना प्राधान्य दिले. महापालिकेतले त्यावेळचे सत्ताधारी स्वार्थ साधण्यात गुंतले होते. पण आता चित्र बदलेल. मुंबईसह राज्यातील सर्वच महापालिकांमध्ये विकासाला गती देण्यावर भाजप महायुती भर देणार असल्याचे मंत्री नितेश राणेंनी सांगितले.

मनपा निवडणुकांच्यावेळी हिंदू मतांमध्ये फूट पाडण्यासाठी ठाकरे बंधू एकत्र आले. पण त्यांच्या प्रयत्नांना अपेक्षित यश मिळाले नाही. दुसरीकडे राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी स्थानिक राजकारणाचा फायदा घेऊ एमआयएमचे १२५ जण निवडून आले. यातून बोध घेऊन हिंदूंनी एकजूट करावी असे नितेश राणे म्हणाले.महायुतीची सत्ता आली आहे. आता मुंबईत महायुतीचाच हिंदू मराठी महापौर होणार अशी ग्वाही नितेश राणेंनी दिली.

## अंबरनाथमधील १२ नगरसेवकांवर कायदेशीर कारवाई करणार - सावंत

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** अंबरनाथमधील काँग्रेसच्या चिन्हावर निवडून आलेल्या १२ नगरसेवकांनी थेट भाजपात प्रवेश केल्यानं राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणावर काँग्रेसनं आक्रमक भूमिका घेतली असून, या सर्व नगरसेवकांचं सदस्यत्व रद्द करण्यासाठी कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. हा प्रकार केवळ अनैतिकच नाही, तर असंवैधानिक असल्याचं काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत यांनी म्हटलं आहे.

काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी अंबरनाथमधील १२ नगरसेवकांनी स्वतंत्र गट स्थापन करून नंतर भाजपात प्रवेश करणे हे पूर्णपणे बेकायदेशीर आहे, असं म्हटलं आहे. या सर्वांना लवकरच कायदेशीर नोटिसा पाठवण्यात येणार असून, त्यांचं सदस्यत्व रद्द करण्यासाठी न्यायालयीन लढाई लढली जाईल, असं त्यांनी स्पष्ट केलं. त्याचबरोबर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अंबरनाथमधील १२ नगरसेवकांनी कोणतीही चर्चा न करता घेतलेला निर्णय चुकीचा आहे, असं म्हटलं आहे. काँग्रेसनं तत्काळ त्यांच्यावर कारवाई करत त्यांना पक्षातून बडतर्फ केलं, पण भाजपानं मात्र त्यांना थेट पक्षात सामावून घेतलं. यावरून भाजपाचा दुतोंडी चेहरा उघड झाला आहे, असा आरोप सपकाळ यांनी केला.

सत्तेसाठी भाजपाला कोणाशीही युती चालते. अकोटमध्ये ओवैसींच्या एमआयएमशीही त्यांनी हातमिळवणी केली आहे. हे भाजपाचे नैतिक अधःपतन आहे, असं सपकाळ म्हणाले. भाजपाच्या कथनी आणि करणीत मोठा फरक असल्याचंही त्यांनी नमूद केलं. "भाजपाला केवळ सत्तेची हाव असून, शिव, शाहू, फुले आणि आंबेडकर यांचे विचारही पुसायचे आहेत. इतकंच काय महाराष्ट्राच्या विकासात मोठं योगदान दिलेल्या नेत्यांची नावंही भाजपाला इतिहासातून हटवायची आहेत. ही मानसिकता ओळखून जनतेनं त्यांना धडा शिकवावा," असं आवाहन सपकाळ यांनी केलं.

राज्यात मोठ्या प्रमाणात बिनविरोध निवडणुका होत असल्याच्या मुद्द्यावरून त्यांनी या बिनविरोध निवडणुका लोकप्रियतेमुळे नाही, तर धमक्या, दबाव आणि पैशांच्या



आमिषामुळे होत आहेत, असा आरोप केला. यात पोलीस, प्रशासन आणि निवडणूक आयोगही अप्रत्यक्ष मदत करत असल्याचं दिसतंय. हे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे, असं सपकाळ यांनी सांगितलं.

एकंदरीत, अंबरनाथमधील या राजकीय घडामोडींमुळे राज्यातील राजकारण तापलं असून, काँग्रेसनं आता कायदेशीर लढाईचा मार्ग स्वीकारत भाजपाला थेट आव्हान दिलं आहे.

## निर्विवाद सत्ता, विकासाला प्राधान्य

इतिहासामध्ये काही तारखा अशा असतात, ज्या केवळ दिनदर्शिकेची पाने बदलत नाहीत, तर त्या तारखा समाजाची मानसिकता आणि राजकारणाची दिशा कायमची बदलतात. दि. १६ जानेवारी २०२६ हा दिवस महाराष्ट्राच्या इतिहासात असाच एका युगांतराचा दिवस म्हणून सुवर्णाक्षरांनी नोंदवला जाईल. कारण, महाराष्ट्राने भावनिक गुलामी नाकारून 'विकासाचा भगवा' फडकावला आहे. गेली तीन-चार वर्षे कायदेशीर पेच, आरक्षणाचे गुंतागुंतीचे गणित आणि प्रशासकीय राजवटीचा वनवास भोगल्यानंतर, जेव्हा मुंबई-पुण्यासह राज्यातील इतर २९ महानगरपालिकांच्या मतदारांनी आपले मत मतपेटीतून व्यक्त केले, तेव्हा त्यांनी केवळ आपले नगरसेवक निवडले नाहीत, तर त्यांनी महाराष्ट्राचे 'उज्ज्वल भविष्य' निवडले आहे. हा जनादेश साधा नाही; हा जनादेश त्या जुन्या, जीर्ण झालेल्या भावनिक राजकारणाला दिलेली कायमस्वरूपी तिलांजली आहे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी व देवेंद्र फडणवीस या जोडीच्या 'विकासाभिमुख हिंदुत्वा'चा केलेला खंबीर स्वीकार आहे. प्रशासकीय राजवटीत ज्याप्रकारे शहरांचे पालकत्व हरवले होते आणि साध्या नागरी सुविधांसाठीही सामान्य माणसाला संघर्ष करावा लागत होता, त्यातून आलेली ही एक प्रकारची 'लोकशाही भूक' होती, जी आता विकासाच्या अन्नानेच शमणार आहे! या निवडणुकीच्या निकालाने महाराष्ट्राच्या राजकारणातली सर्वांत मोठी आणि महत्त्वाची घटना अधोरेखित केली आहे; ती म्हणजे, शरद पवारांच्या अर्ध्या शतकाच्या राजकारणाचा झालेला अधिकृत अस्त! गेली ५० वर्षे महाराष्ट्राचे राजकारण म्हणजे केवळ जोडतोड, जातींची गणिते, सहकारी संस्थांचे जाळे आणि सत्तेचे केंद्रीकरण असेच समीकरण बनले होते. शरद पवारांची ही 'सहकारी सरंजामशाही'ची पद्धत ग्रामीण महाराष्ट्रात काही काळ चालली असेल, पण आजच्या आधुनिक, टेनोसॅव्ही आणि महत्त्वाकांक्षी शहरी महाराष्ट्राने ती पूर्णपणे नाकारली आहे. मराठी माणूस काय विचार करतोय? याचा मक्ता आता बारामतीकडून काढून घेतला गेला आहे. आजच्या तरुण पिढीला कोणाची खेळी यशस्वी झाली, कोणाचे आमदार फुटले, यांत रस उरलेला नाही. त्यांना रस आहे, तो आपल्या शहराचा वेग वाढवण्यात, स्टार्टअप इकोसिस्टममध्ये आणि उत्तम इन्फ्रास्ट्रचरमध्ये. शरद पवारांचे ते जुने, मुरब्बी पण आताच्या काळात कालबाह्य ठरलेले डावपेच शहरी मतदारांच्या, विशेषतः 'जेन-झी'च्या मनातून पूर्णपणे उतरले आहेत, हे या निकालाने स्पष्ट केले आहे. या महाविजयाचे विश्लेषण करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावरअसलेला शहरी मतदाराचा अढळ विश्वास. हा विजय केवळ स्थानिक गटारी किंवा रस्त्यांच्या मुद्द्यांचा नाही, तर तो 'विकसित भारत २०४७' या मोदींच्या स्वप्नाला महाराष्ट्राने दिलेली खंबीर साथ आहे. शहरी मतदाराला हे पक्के समजले आहे की, केंद्रात मोदींचे सक्षम सरकार असताना जर राज्यात आणि महापालिकेतही समविचारी सरकार असेल, तरच विकासाचे 'डबल इंजिन' सुसाट धावू शकते. मुंबईचे मेट्रो नेटवर्क असो, पुण्याचा 'रिव्हर फ्रंट डेव्हलपमेंट प्रोजेट' असो किंवा नागपूरचा 'लॉजिस्टिक हब', या प्रत्येक महत्त्वाकांक्षी प्रोजेक्टमागे केंद्राचा निधी आणि मोदींचे व्हिजन उभे आहे. मतदारांनी हे ओळखले की, 'मोदींची गॅरेंटी' आणि फडणवीसांचे सूक्ष्म नियोजन एकत्र आले, तरच शहरांचे नशीब बदलू शकते. त्यामुळे हा कौल स्थानिक असला, तरी त्याचा आत्मा राष्ट्रीय आणि हिंदुत्ववादी आहे. या विजयाचे स्थानिक शिल्पकार म्हणून केंद्रस्थानी नाव येते, ते देवेंद्र फडणवीस यांचे. महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक नेते झाले; पण प्रशासकीय पकड आणि राजकीय चातुर्य यांचा असा दुर्मीळ संगम दुसऱ्या कोणत्याही नेत्यात पाहायला मिळत नाही. या निवडणुकीत विरोधकांनी पुन्हा एकदा अस्मितेचा आणि मराठीपणाचा भावनिक मुद्दा पुढे केला होता. पण फडणवीसांनी या अपप्रचाराला शब्दांनी उत्तर दिले नाही, तर आपल्या कामातून दिले! त्यांनी मुंबईला कोस्टल रोड आणि मेट्रोचे जाळे दिले, नागपूरला समृद्धी महामार्ग दिला आणि पुण्याला रिंगरोडचे व्हिजन दिले. फडणवीसांचे यश हे आहे की, त्यांनी निवडणुकीचा अजेंडा जात आणि धर्म यावरून हलवून विकास, गती आणि पारदर्शकता यावर आणला. आजच्या तरुण मतदार आणि जागतिक स्तरावर विचार करणाऱ्या नागरिकांना शहराला गती देणारा मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) हवा आहे आणि फडणवीसांनी ती भूमिका चोख बजावली आहे. दुसरीकडे, या निवडणुकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची युती. ज्या दोन भावांनी तीन दशके एकमेकांवर विखारी टीका केली, ते अचानक सत्तेसाठी एकत्र आले. ही युती महाराष्ट्राच्या हितासाठी नव्हती, तर केवळ भाजपला रोखण्यासाठी होती. मतदारांनी याला 'नैसर्गिक युती' न मानता 'अस्तित्वासाठी केलेली लाचार तडजोड' मानले. एकीकडे, राज ठाकरेंनी सोडलेला आपला आक्रमक हिंदुत्ववादी बाणा आणि दुसरीकडे उद्धव ठाकरेंची काँग्रेसशी झालेली वैचारिक तडजोड, हा वैचारिक गोंधळ मतदारांनी अचूक ओळखला. त्यांना हे समजले की, बाळासाहेबांची खरी भगवी पताका आता संधीसाधूंच्या हातात नसून ती मोदी-फडणवीसांच्या विचारांशी एकनिष्ठ राहणाऱ्या महायुतीच्या हातातच सुरक्षित आहे. मुंबई आणि ठाण्यासारख्या शहरांत, जिथे मध्यमवर्ग मोठ्या प्रमाणावर आहे, तिथे मतदारांनी स्थिरतेला पसंती दिली, गोंधळाला नाही! सर्वांत लक्षवेधी, रोमांचक आणि तितकीच महत्त्वाची लढाई मात्र पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये पाहायला मिळाली. इथे भाजपची खरी लढाई बाह्य विरोधकांपेक्षा आमचेच मित्रपक्ष असलेल्या अजित पवार गटाशी होती. राज्यातील सत्तेत ते सोबत असले, तरी या स्थानिक निवडणुकीत अजित पवार हेच भाजपचे अघोषित, पण 'अधिकृत' प्रतिस्पर्धी बनले होते. स्थानिक वर्चस्व टिकवण्यासाठी आणि आपल्या 'सहकारी मॉडेल'ची पकड ठेवण्यासाठी त्यांनी युतीधर्माला तिलांजली देत, चक्क आपल्या जुन्या शत्रूशी - शरद पवार गटाशी उघड हातमिळवणी केली होती. ही युती आता छुपी राहिली नव्हती, तर ती उघड गद्दारी होती. भाजपने सुरुवातीला संयम पाळला; पण जेव्हा अजित पवारांनी आणि त्यांच्या स्थानिक नेत्यांनी उघडपणे भाजपच्या उमेदवारांना पाडण्यासाठी यंत्रणा लावली, तेव्हा मात्र भाजपने त्यांना त्यांच्याच भाषेत सडेतोड आणि 'परफेक्ट' उत्तर दिले.

# राष्ट्रीय शिक्षण धोरणातून सक्षम व सृजनशील भारत घडेल: उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील

## मुंबई विद्यापीठाचा वार्षिक दीक्षान्त समारंभ संपन्न
## विविध विद्याशाखांतील १ लाख ७२ हजार ५२२ स्नातकांना पदव्या प्रदान

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबई विद्यापीठ हे देशातील नवशिक्षणाची ज्योत प्रज्वलित करणारे अग्रगण्य विद्यापीठ असून न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांसारख्या महान विभूतींनी येथे शिक्षण घेतले आहे. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून नवस्नातकांनी देशाच्या प्रगतीत आपले मोलाचे योगदान द्यावे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे सक्षम, सृजनशील आणि ज्ञानसमृद्ध भारत घडविण्याचे भक्कम पायाभूत धोरण आहे. या धोरणाद्वारे विद्यार्थ्यांना नवोपक्रम, संशोधन आणि उद्योजकतेची प्रेरणा मिळून देशाच्या सर्वांगीण विकासात त्यांचा सक्रीय सहभाग राहील, असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.

मुंबई विद्यापीठाचा वार्षिक दीक्षान्त समारंभ सर कावसजी जहाँगीर दीक्षान्त सभागृह फोर्ट येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील बोलत होते. यावेळी कार्यक्रमास भारत सरकारचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार प्रा. अजय कुमार सूद हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे,परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. पूजा रौंदळे यांच्यासह अधिसभा, व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषदेचे मान्यवर सदस्य, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता यांच्यासोबत विविध महाविद्यालयांचे प्राचार्य आणि विभागप्रमुख, प्राध्यापक उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, २१व्या शतकात ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मोठे परिवर्तन होत असल्याचे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांनी 'कसे शिकायचे' हे शिकण्यावर भर द्यावा. राष्ट्रीय शिक्षण धोरणामुळे शिक्षण अधिक अनुभवात्मक, समावेशक आणि आनंददायी होईल. विज्ञानाबरोबरच कला, क्रीडा, संस्कृती आणि मूल्यशिक्षणाचा समावेश होऊन सर्वांगीण विद्यार्थी तयार होतील.

शिक्षक हा शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. शिक्षकांना सक्षम करणे आणि शिक्षण क्षेत्रात सर्वोत्तम बुद्धिमान व्यक्तींना आकर्षित करणे ही काळाची गरज आहे.प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेवर आधारित शिक्षण धोरणामुळे आत्मज्ञान, सृजनशीलता आणि सामाजिक जबाबदारी असलेला विद्यार्थी घडेल, असेही मंत्री श्री. पाटील यांनी नमूद केले.

कुतूहल, सर्जनशीलता आणि नवोपक्रमच भारताच्या प्रगतीचा पाया- डॉ. अजय कुमार सूद मुंबई विद्यापीठाच्या वार्षिक दीक्षांत समारंभात भारत सरकारचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार डॉ. अजय कुमार सूद यांनी उपस्थित नवस्नातकांना मार्गदर्शन करताना म्हटले की, भारतीय युवक हा जागतिक स्तरावर परिवर्तनाचा वाहक ठरत असून, कुतूहल, सर्जनशीलता व नवोपक्रम यांचा संगम असलेले शिक्षण हे भारताच्या प्रगतीचे आधारस्तंभ ठरणार आहे.



शिक्षण पद्धतीत कुतूहल-केंद्रित अध्यापन, संकल्पनात्मक समज आणि प्रत्यक्ष प्रयोगाधारित शिक्षण या तीन बदलांची गरज आहे. दर्जेदार शिक्षण, रोजगारक्षमता आणि कृत्रिम बुद्धिमत्तेतील प्रगती यामुळे भारताला जागतिक नेतृत्व प्राप्त होत असल्याचे डॉ. सूद यांनी सांगितले.

डॉ. सूद यांनी 'एस-लाइफ फ्रेमवर्क'ची संकल्पना मांडत विज्ञानाचे दैनंदिन जीवनाशी नाते, प्रयोगशाळांचा पुनरुज्जीवन, संशोधनाचे अभ्यासक्रमात एकत्रीकरण, विज्ञान महोत्सवांचे आयोजन आणि तरुणांचा डिजिटल सहभाग यावर भर दिला.भारत सरकारचा 'वन नेशन वन सबस्क्रिप्शन' () उपक्रम संशोधनाचे लोकशाहीकरण करत असून, देशातील लाखो विद्यार्थी जागतिक दर्जाच्या संशोधनापर्यंत पोहोचू शकत आहेत. तसेच, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित २.०'' च्या माध्यमातून आरोग्य, शेती आणि शाश्वत विकास क्षेत्रात परिवर्तन घडवण्याचे आवाहन त्यांनी केले.

महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार पटेल यांसारख्या दिग्गजांच्या पाऊलखुणांवर चालत, आजचा युवक धैर्य, सर्जनशीलता आणि वचनबद्धतेच्या बळावर सक्षम भारत घडवेल, अशा शब्दांत डॉ. सूद यांनी नवस्नातकांना प्रेरित केले.

मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.(डॉ.) रविंद्र कुलकर्णी यांनी अहवालाचे वाचन केले.

विविध विद्याशाखांतील १ लाख ७२ हजार ५२२ स्नातकांना पदव्या प्रदान

या वर्षीच्या दीक्षान्त समारंभामध्ये पदवी आणि पदव्युत्तर मिळून विविध विद्याशाखांतील १ लाख ७२ हजार ५२२ स्नातकांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. यामध्ये ८४ हजार ३१८ मुले आणि ८८ हजार २०२ मुलींचा समावेश असून इतर ०२ विद्यार्थी समाविष्ट आहेत. यामध्ये पदवी अभ्यासक्रमासाठी १ लाख ४९ हजार ९८२ विद्यार्थ्यांचा समावेश असून पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी २२ हजार ५४० विद्यार्थ्यांचा समावेश आहे. पदवी अभ्यासक्रमांसाठी ७४ हजार ७२९ मुले आणि ७५ हजार २५२ मुलींचा समावेश आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी ९ हजार ५८९ मुले आणि १२ हजार ९५० मुलींचा समावेश असून इतर १ विद्यार्थ्याचा समावेश आहे.

पी.एचडी पदवींचा तपशील

यावर्षीच्या दीक्षान्त समारंभामध्ये विविध विद्याशाखेतील ६०२ स्नातकांना विद्यावाचस्पती (पी. एचडी) पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेसाठी २६९, वाणिज्य व व्यवस्थापन १४५, मानवविज्ञान विद्याशाखेसाठी १०९ आणि आंतर-विद्याशाखीय अभ्यासशाखेसाठी ७९ एवढ्या पदव्यांची संख्या आहे. विद्यापीठाच्या विविध परीक्षांमध्ये प्राविण्य संपादन केलेल्या १९ विद्यार्थ्यांना २१ पदके मान्यवरांच्या हस्ते बहाल करण्यात येणार आहेत. यामध्ये १२ मुली व ७ मुलांचा समावेश आहे. त्याचबरोबर २ स्पर्धा पारितोषिकेही यावेळी प्रदान करण्यात आली.

पदवी प्रमाणपत्रांचा तपशील डिजिलॉकर होणार उपलब्धः

दीक्षान्त समारंभानंतर विविध विद्याशाखांतील विद्यार्थ्यांना त्यांचे पदवी प्रमाणपत्र डिजीलॉकर वर उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया विद्यापीठामार्फत सुरु आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे एबीसी आयडी खाते तयार आहेत अशा विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका आणि क्रेडिट्सचा तपशीलही डिजीलॉकरवर उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

## ३०००० कोटी मालमत्तेतील वाद शिगेला? करिष्मा कपूरला दोन आठवड्यात खुलासा करण्याचे न्यायालयाकडून आदेश

**नवी दिल्ली :** करिष्मा कपूर व प्रिया कपूर यांच्यातील मालमत्तेतील वाद आता नव्या उंचीवर पोहोचवण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ३०००० कोटी रूपयांच्या मालमत्तेतील संघर्षावरून आता नवा वाद पेटणार आहे. आता प्रिया कपूर यांच्या नव्या अर्जावरुन करिष्मा कपूर यांच्या वकीलांना दोन आठवड्यात स्पष्टीकरण देण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. अभिनेत्री करिश्मा कपूर व दिवंगत पती सोनाकॉमस्टार कंपनीचे सर्वेसर्वा संजय कपूर यांच्या घटस्फोटानंतर मालमत्तेतील हिस्सावरून संजय कपूर यांची विद्यमान पत्नी प्रिया कपूर व संजय कपूर यांची पूर्व पत्नी करिष्मा कपूर यांच्यात मालमत्तेवरून दावे प्रतिदावे केले जात होते. आता हा वाद आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचला असताना प्रिया कपूर यांनी संजय व करिष्मा कपूर यांच्या घटस्फोटाची कागदपत्रे मिळावीत यासाठी अर्ज दाखल केला आहे.

दरम्यान या प्रकरणी करिष्मा कपूर यांचे वकील रवी शर्मा व अपूर्व शुक्ला यांनी मात्र या प्रिया यांच्या मागणीविरोधात स्वतंत्र अपील केले आहे. संजय कपूर व करिष्मा कपूर यांच्या घटस्फोटा दरम्यान कुठल्या प्रकारचे आर्थिक व्यवहार झाले तसेच किती रकमेची तडजोड आणि उलाढाल झाली याचा छडा लावण्यासाठी या सगळ्या व्यवहारांची कागदपत्रे प्रिया कपूर यांच्या वकिलांनी सर्वोच्च न्यायालयात केली असताना मात्र करिश्मा कपूरचे वकील रवी शर्मा आणि अपूर्व शुक्ला यांनी प्रिया कपूरच्या अर्जाला आक्षेप घेतला.

# 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सामाजिक संघटनांनी पुढाकार घ्यावा : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## सामाजिक ऐक्य, सेवा व प्रेरणेचा ऐतिहासिक सोहळा
## प्रत्येकाने जास्तीत जास्त योगदान देण्याचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**



**नांदेड/प्रतिनिधी** : 'हिंद-दी-चादर'' अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी मोदी मैदान, नांदेड येथे भव्य-दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व सामाजिक संस्था, संघटना व स्वयंसेवी कार्यकर्त्यांनी सकारात्मकतेने पुढाकार घ्यावा व सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

कार्यक्रमाच्या नियोजनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे, कार्यकारी अधिकारी तथा समन्वयक डॉ. जगदीश सकवान,तहसीलदार संजय वारकड यांच्यासह विविध सामाजिक संस्था व संघटनांचे अध्यक्ष व प्रतिनिधी उपस्थित होते.

मोदी मैदानावर कार्यक्रमस्थळी सुमारे ३५० स्टॉल उभारण्यात येणार असून प्रत्येक सामाजिक संघटनेने किमान ५ ते १० स्टॉल उभारून भाविकांना सेवा द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांनी केले. हे स्टॉल दोन्ही दिवस सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत सुरू राहतील. प्रत्येक स्टॉलवर संबंधित संघटनेचे बॅनर लावण्यात येणार असून भाविकांसाठी पिण्याचे पाणी, प्रसाद, अल्पोपहार, माहिती व सेवा सुविधा उपलब्ध करून देण्याचे आवाहन करण्यात आले.

तसेच २४ जानेवारी रोजी तख्त सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्वारा येथून निघणाऱ्या पालखी मिरवणुकीचे स्वागत करून मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असेही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले. या ठिकाणी भाविक मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहणार असल्याने सेवा व्यवस्थेसाठी स्वयंसेवकांनी अधिकाधिक योगदान द्यावे, असे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमासाठी दोन दिवसांत ८ ते १० लाख भाविक नांदेडमध्ये दाखल होण्याची शक्यता असून, त्यामुळे सर्व प्रशासकीय यंत्रणांसह सामाजिक संघटनांनी सज्ज राहणे आवश्यक आहे, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचा शाळा, महाविद्यालये व सामाजिक माध्यमांतून व्यापक प्रचार करण्यात येत आहे.

कार्यक्रमाच्या बाहेर, पार्किंग स्थळी, स्टॉलसाठी आवश्यक साहित्य आणण्यासाठी वाहने व संबंधित व्यक्तींना प्रवेश पासेसची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

हा कार्यक्रम केवळ धार्मिक नसून सामाजिक ऐक्य, सेवा आणि प्रेरणा देणारा ऐतिहासिक सोहळा असल्याने जास्तीत जास्त सामाजिक संघटनांनी पुढे येऊन सहभाग घ्यावा व ''हिंद-दी-चादर'' शहीदी समागम यशस्वी करण्यासाठी हातभार लावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

यावेळी कार्यक्रमाच्या एकूण नियोजनाची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी उपस्थितांना दिली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# ‘बजाज पुणे ग्रँड टूर २०२६’ केवळ स्पर्धा नसून पुढील पिढ्यांसाठी टिकणारा वारसा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ चा भव्य शुभारंभ

दैनिक आपला विदर्भ







**पुणे/प्रतिनिधी :** बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ ही केवळ आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धा म्हणून मर्यादित न राहता पुढील पिढ्यांसाठी टिकून राहणारा पायाभूत आणि क्रीडा वारसा ठरणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पुणे येथील जेडब्लू मेरियट हॉटेल मध्ये आयोजित या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय बजाज पुणे ग्रँड टूरच्या शुभारंभ आणि आंतरराष्ट्रीय सायकलपटूंच्या स्वागतप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सामजिक न्याय राज्य मंत्री माधुरी मिसाळ, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे महासचिव दातो मनिंदर पाल सिंग मंचावर उपस्थित होते.

पुणे जिल्हा हा इतिहास, संस्कृती आणि आधुनिकतेचा संगम असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, येथे प्रत्येक किलोमीटरवर शौर्य, परंपरा आणि संस्कृतीच्या कथा अनुभवायला मिळतील. पुणे हे सांस्कृतिक राजधानीबरोबरच तंत्रज्ञान, मॅन्युफॅक्चरिंग आणि आयटी क्षेत्रातील अग्रगण्य शहर असून, पश्चिम घाटाचे निसर्गसौंदर्य स्पर्धेला वैशिष्ट्यपूर्ण उंची देईल. ही स्पर्धा लवकरच जागतिक क्रीडा कॅलेंडरमधील प्रतिष्ठेची वार्षिक स्पर्धा बनेल. या माध्यमातून पुणे जिल्हा क्रीडा व पर्यटन क्षेत्रात आंतरराष्ट्रीय नकाशावर ठळकपणे येईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ ही भविष्यातील अनेक शतकांसाठी टिकणाऱ्या मार्गाची सुरुवात असल्याचे सांगत मुख्यमंत्री म्हणाले, स्पर्धेसोबत विविध पूरक उपक्रम राबवण्यात येणार असून, पर्यटकांना निसर्गासोबतच छत्रपती शिवाजी महाराजांच्या ऐतिहासिक किल्ल्यांचे दर्शन घेण्याची संधी मिळणार आहे.

‘यूसीआय’च्या इतिहासात मैलाचा दगड ठरेल, अशा रितीने ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्व रायडर्सनी खिलाडूवृत्तीने स्पर्धा यशस्वी करण्याचे असे आवाहन केले.

जगभरातील किमान ३५ देशांमधून आलेल्या आंतरराष्ट्रीय सायकलपटू, व्यवस्थापक, प्रशिक्षक आणि सहकारी अधिकाऱ्यांचे महाराष्ट्र शासनाच्यावतीने स्वागत करताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पर्धेच्या भव्य आणि नेटक्या आयोजनासाठी पुणे जिल्हा प्रशासन व सर्व शासकीय यंत्रणांचे विशेष अभिनंदन केले. अत्यंत कमी कालावधीत आंतरराष्ट्रीय मानकांनुसार स्पर्धेची तयारी पूर्ण करणे हे उल्लेखनीय असून ४३७ किलोमीटर लांबीचे रस्ते जागतिक दर्जाच्या सायकलिंग स्पर्धेस अनुरूप विकसित करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

स्पर्धेसाठी केवळ रस्तेच नव्हे, तर आवश्यक संपूर्ण सुविधा उभारण्यात आल्या असून, कामाच्या अंमलबजावणीचा हा वेग अभूतपूर्व असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

गेल्या तीन दशकांतील प्रशासनातील अनुभवात पाहिलेला हा एखाद्या आयोजनाच्या तयारीचा सर्वोच्च वेग असल्याचे नमूद करत त्यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

यावेळी पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी प्रास्ताविक करताना ‘बजाज पुणे ग्रँड टूर २०२६’ ही स्पर्धा पुणे व महाराष्ट्राच्या क्रीडा, पर्यटन आणि आंतरराष्ट्रीय प्रतिमेसाठी मैलाचा दगड ठरेल, असे नमूद केले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने केलेल्या तयारीचे कौतुक करीत पुणेकरांनी मोठ्या उत्साहाने या ऐतिहासिक सायकलिंग स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी खासदार प्रा. मेधा कुलकर्णी, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, राहुल कुल, महेश लांडगे, चेतन तुपे, हेमंत रासने, शंकर जगताप, महाराष्ट्र मेट्रोरेल कॉर्पोरेशन लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेशकुमार कुमार, पिंपरी चिंचवड शहरचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, राज्याच्या क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आदी उपस्थित होते.

भारतीय पोशाखाचा असाही गौरव

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ज्या वेळी जगभरातून आलेल्या सायकलपटूंचे मंचावर स्वागत करत होते, त्यावेळी सर्वांच्या नजरा सायकलपटूंच्या पोशाखावर खिळल्या होत्या. कुर्ता, पायजमा आणि त्यावर जॅकेट असा आपल्याकडच्या महोत्सवी पोशाखात सगळे खेळाडू उठून दिसत होते. या क्षणाने भारतीय संस्कृतीचा गौरव जागतिक पातळीवर अधोरेखित झाला. विविध भाषा, देश आणि संस्कृतींचे प्रतिनिधित्व करणारे सायकलिस्ट एकाच पारंपरिक वेशात मंचावर उभे राहिलेले दृश्य हे केवळ औपचारिक स्वागत नव्हते, तर ‘‘वसुधैव कुटुंबकम्’’ या भारतीय विचारधारेचे जिवंत दर्शन होते.

कुर्ता, पायजमा आणि त्यावर जॅकेट या पोशाखातून भारतीय परंपरेचा सन्मान राखत या आंतरराष्ट्रीय पाहुण्यांनी आपुलकीने कार्यक्रमात सहभाग नोंदवला. या आगळ्या-वेगळ्या स्वागतामुळे भारतीय संस्कृती, आदरातिथ्य आणि जागतिक स्तरावर संवाद साधण्याची क्षमता ठळकपणे पुढे आली. खेळाच्या माध्यमातून संस्कृतींची सांगड घालणारा हा प्रसंग उपस्थितांसह जगभरातील प्रेक्षकांसाठीही स्मरणीय ठरला.

## ७७ वा प्रजासत्ताक दिन: राष्ट्रपती भवनातील ॲट होम सोहळ्यासाठी महाराष्ट्रातील चार मान्यवरांना विशेष निमंत्रण



नवी दिल्ली दि. १६ : भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रपती भवनात आयोजित होणाऱ्या अत्यंत प्रतिष्ठित ॲट होम स्वागत समारंभासाठी महाराष्ट्रातील चार मान्यवरांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या वतीने रायगड जिल्ह्यातील सगुणा बागचे चंद्रशेखर भडसावळे, नांदेडचे सर्पदंश तज्ज्ञ डॉ. दिलीप पुंडे, जळगावचे अरविंद गुलाब चौधरी आणि मुंबईचे स्टार्टअप उद्योजक आकाश शहा यांना विशेष निमंत्रण पाठविण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यातील सगुणा बागचे संस्थापक आणि सुप्रसिद्ध कृषिरत्न श्री. चंद्रशेखर हरि भडसावळे यांच्या शेती, नैसर्गिक शेती, शून्य-नांगरणी तंत्र (एसआरटी), जलसंवर्धन, कृषी पर्यटन आणि ग्रामीण विकास या क्षेत्रामधील उल्लेखनीय कामगिरीची दखल या निमित्ताने घेण्यात आली आहे. १९७६ पासून शेती क्षेत्रात कार्यरत असलेल्या भडसावळे यांनी नेरळ येथील सगुणा बागला एकात्मिक शेतीचा एक जागतिक दर्जाचा आदर्श नमुना म्हणून विकसित केले आहे. मत्स्यव्यवसाय, वनशेती, फलोत्पादन, गो-पालन आणि पर्यटन यांची सांगड घालणारे हे मॉडेल आज देशभरातील शेतकरी आणि विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरले असून, शेतकऱ्यांचा आत्मविश्वास उंचावण्यात त्यांचा मोठा वाटा आहे.

वैद्यकीय क्षेत्रातील मानवतावादी कार्याबद्दल नांदेड जिल्ह्यातील मुखेड येथील विख्यात तज्ज्ञ डॉ. दिलीप पुंडे यांना ही विशेष निमंत्रण देण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर येथून एम डी पदवी प्राप्त केल्यानंतर, शहरात करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध असतानाही त्यांनी जाणीवपूर्वक अतिमागास आणि डोंगराळ अशा मुखेड भागाची रुग्णसेवेसाठी निवड केली. गेल्या ३० वर्षांपासून त्यांनी सर्पदंशावरील उपचारांत क्रांती घडवून आणली आहे. १९८८ मध्ये मुखेड परिसरात सर्पदंशामुळे होणारा २५ टक्के मृत्यूदर आज डॉ. पुंडे यांच्या शास्त्रीय उपचार पद्धतीमुळे शून्य टक्क्यांवर आला आहे. त्यांच्या या कार्याची जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्युएचओ) दखल घेऊन त्यांची निवड राष्ट्रीय सर्पदंश मार्गदर्शन समितीमध्ये केली आहे.

याच सोहळ्यासाठी जळगाव जिल्ह्यातील धरणगाव येथील अरविंद गुलाब चौधरी यांनाही निमंत्रित करण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घेऊन आपले हक्काचे घर मिळवणाऱ्या यशस्वी लाभार्थ्यांचे प्रतिनिधित्व ते या सोहळ्यात करणार आहेत. केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजना सर्वसामान्यांच्या जीवनात कसा बदल असल्याचे उदाहरण ठरले आहेत.

तसेच, मुंबईचे युवा उद्योजक आकाश शहा यांना स्टार्टअप्स आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील विशेष योगदानासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. देशाच्या आर्थिक प्रगतीत स्टार्टअप्स महत्त्वाची भूमिका बजावत असताना, आकाश शहा यांनी या क्षेत्रात केलेल्या भरीव कामगिरीची दखल राष्ट्रपती भवनाकडून घेण्यात आली आहे.

प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य कार्यक्रमानंतर राष्ट्रपतींच्या उपस्थितीत पार पडणारा ॲट होम हा एक अत्यंत प्रतिष्ठित सोहळा मानला जातो.

## हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या अनुषंगाने हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी घेतली नांदेड जिल्हाधिकाऱ्यांची भेट

दैनिक आपला विदर्भ



**नांदेड/प्रतिनिधी :** ‘‘हिंद-दी-चादर’’ श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे दि. २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी मोदी मैदान, नांदेड येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा प्रशासनामार्फत काटेकोर नियोजन करण्यात आले असून, त्या अनुषंगाने हिंगोली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयात भेट दिली. यावेळी नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या आयोजनासाठी जिल्हा प्रशासनाने केलेल्या नियोजनाबाबत सविस्तर माहिती देत चर्चा केली. तसेच कार्यक्रमाच्या विविध बाबींवर समन्वय व व्यवस्थापनाबाबत विचारविनिमय करण्यात आला. हिंगोली जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनीही या कार्यक्रमाच्या अनुषंगाने हिंगोली जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या नियोजनाची माहिती दिली. या प्रसंगी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी ‘‘अविरत महसूल’’ या पुस्तिकेची प्रत भेट देऊन राहुल गुप्ता यांचे स्वागत केले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, कार्यकारी अधिकारी तथा हिंद दी चादर शहीदी समागम कार्यक्रमाचे शासकीय समन्वयक जगदीश सकवान, तहसीलदार आनंद देऊळगावकर आदी अधिकारी उपस्थित होते.


## भारताचा जर्मनीसोबत सेमीकंडक्टर इकोसिस्टमवर करार

**मुंबई/प्रतिनिधी :** भारत आणि जर्मनी यांच्यातील संबंध आता धोरणात्मक तंत्रज्ञान सहकार्याचे झाले आहेत. जर्मन चांसलर फ्रिड्रिख मेर्ज़ यांच्या अलीकडच्या भारत भेटीदरम्यान दोन्ही देशांनी ’’भारत-जर्मनी सेमीकंडक्टर इकोसिस्टम भागीदारी’’जाहीर केलीय. ही भागीदारी सामान्य गुंतवणूक करार नसून हा एक बहुस्तरीय आराखडा आहे, जो युरोपातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थेच्या औद्योगिक ताकदीला बळ देणार आहे. यामुळं भारताचं सेमीकंडक्टर उत्पादन जगभरात पोहचण्यास मदत होणार आहे. सेमीकंडक्टर आता आर्थिक स्पर्धा, राष्ट्रीय सुरक्षा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी अत्यंत महत्त्वाचा पार्ट झाला आहेत. या पार्श्वभूमीवर ही भागीदारी महत्वाची ठरतेय.जागतिक सेमीकंडक्टर उत्पादनामध्ये तैवान, चीन आणि अमेरिका पुढं आहे.

’जर्मनी चिप उत्पादनात तैवान किंवा कोरियासारखी पुढं नाहीय, पण ती केंद्रस्थानी नक्की आहे. चिप उत्पादन उपकरणे, रसायने आणि अचूक अभियांत्रिकी यात जर्मनी मजबूत आहे.’’ मात्र, भारत आता हळूहळू संपूर्ण परिसंस्था उभी करत आहे, असं प्रिमस पार्टनर्सचे सह-संस्थापक आणि सीईओ देवरूप धर म्हणाले.जर्मनीत इन्फिनियन टेक्नॉलॉजीज सारखी जगातील आघाडीची सेमीकंडक्टर कंपनी आहे. तरीही भारत-जर्मनी भागीदारीत आतापर्यंत मोठ्या गुंतवणुकी किंवा फॅबच्या घोषणा झालेल्या नाहीत.

देवरूप धर सांगतात, ’’एका फॅबसाठी १०-२० अब्ज डॉलर खर्च येऊ शकतो, आणि तो पूर्ण क्षमतेनं चालू होण्यास अनेक वर्षे लागतात. पण फॅब असूनही वरच्या-खालच्या प्रक्रिया, डिझाइन, पॅकेजिंग, चाचणी, उपकरणे आणि साहित्य याचं ज्ञान नसेल, तर खरी सेमीकंडक्टर परिसंस्था तयार होत नाही.’’ तज्ज्ञांच्या मते या भागीदारीचं खरं मूल्य जर्मनीच्या औद्योगिक सेमीकंडक्टर, पॉवर इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोटिव्ह चिप्स आणि अचूक उत्पादन यंत्रणांच्या ज्ञानात आहे.

## शब्दकोडे क्र. 66



आडवे शब्द

१. श्रीरामाचा तेरा अक्षरी मत्र १०. शर्त, पण १२. फायदा, कल्याण १३. जन्म १४. माझे १५. रमापती १६. डग्याची साथीदार १७. वाळा १८. चांदणी २०. सीतेला पळविणारा २२. आवड, उत्कट इच्छा २४. धातूचा धागा २५. नरमच्या विरुद्ध २७. भीमाजवळचे शस्त्र २९. उथळ पाण्याचा आवाज ३०. नवरा (ग्रा.) ३१. 'रामचरित मानस' लिहिणारे ३३. कामदेव ३४. अंजन ३६. शहराचा भाग, पेठ, पूर्ण ३८. भारवाहक ३९. थंडावा ४०. सगळीकडे ४१. चलनवलन ४२. श्रीयुत ४४. व्यापारी फायदा ४६. पाप ४७. धाव, आघात ४९. वक्र ५२. आवरण ५४. कोवळ्या दुधाचा पदार्थ ६. 'दिव्यावरील' अंधार! ५८. लिहिताना डावीकडे सोडलेली मोकळी जागा ५९. साखळी असलेला दिवा ६०. जंगला ६२. मैत्रीण ६३. निकट, जवळ ६५. गुल होणारा दिवा! ६६. समशेर ६९. उंटाच्या पाठीवरील उंचवटा ७०. कायदेशीर नसलेले ७२. स्त्री भूत ७३. नड, आवश्यकता ७४. डाकुंचा प्रमुख ७५. अंगरखा ७७. आंध्रमधून आलेली भटकी जमात ७८. नमस्कार ८१. झोपेचे खोबरे ८२. रात्रीचा पाऊस ८३. वस्तू निर्मितीची जागा

उभे शब्द

१. धनको, धनवान २. बाई, स्त्री ३.सांगलीतील पूर्वीचे संस्थान ४. सुकुमार ५. अंत:करण ७. बस्तान ८. मृत्यूचा राजा ९. मृत्यू १०. सेपे नसलेले ११. चेष्टा १७. अफूचे बीज १९. संतापी २१. आशीर्वाद २३. मायेची सावली २५. मनोरंजन करणारा २६. भालप्रदेश २७. विटी- दांडूचा खड्डा २८. विदुराला हिणवताना वापरले गेलेले संबोधन ३१. मंजिऱ्यांचे रोपटे ३२. बायको (सं.) ३३. स्निग्ध औषध ३५. भारतीय सैनिक ३७. भविष्यकथनासाठी उपयोगी मानला जाणारा मणी ३८. मिठाईचा एक प्रकार ३९. गाणे म्हणणारा ४१. हस्तलाघव ४३. काहीजणांसाठी हे निद्रासन ठरते! ४५. बरगडी ४६. चौथा हिस्सा ४८. पहारेकरी ५०. दरोडा ५१. चर्चा, विचारविनिमय ५२. सत्व, ताकद ५३. अजून, जास्त ५५. वर-वधूची मिरवणूक ५७. जिम्मेदार ६१. समीक्षक ६२. रंग बदलणारा प्राणी ६४. गरजू, अडलेला ६७. मध्यस्थ ६८. फुकाची पायपीट ६९. सुसर ७०. हरभरा डाळीचे पीठ ७१. जेव्हा ७५. मैत्री ७६. सर्वसत्ताधीश, भूपती ७९. औषध ८०. संगीतातील पलटे

### शब्दकोडे क्र. 65 चे उत्तर

आडवे उत्तर

१.विदूषक ३.बातमीदार ७.पोचपावती ९.बोबडा १०.वेगवान १२.ललकारी १४.यंदा १५.चाकरचुकर १८.रतन २१.रटाळ २३.मकड २५.सरहद २९.अवसर ३१.हरामखोर ३२.कसाई ३३.पालव ३४.टपणे ३६.सटरफटर ३९.नवलाई ४२.बाबा ४४.शकट ४६.टकटक ४८.चराचर ५०.फणकारा ५२.कणेर ५३.कटोरा ५४.रक्तदान ५७अ.कसेल त्याची जमीन ६१.तडकाफडकी ६४.सम ६६.लट ६८.पदोपदी ६९.जनार्दन ७१.वाकडसर ७३.मोती ७४.कपटी ७५.गर्द ७६.रत

उभे उत्तर

१.विद्यालय २.षटकार ३.बाबत ४.तडा ५.दावेदार ६.रग ७.जनक ८.पाल चुकचुकणे ११.वाचाळ १३.रीतसर १६.रमा १७.कड १९.नर २०.खोट्या नाण्याचा आवाज २२.टालमटोला २४.घाव २६.हद्दपार २७.खारट २८.साईबाबा २९.अवस ३०.समीर ३१.हवन ३५.पलटण ३७.टरकणे ३८.फरक ४०.वनचर ४१.ईश ४२.बावरा ४३.कचरा ४५.कफन ४६.टक ४७.टरफल ४९.रक्तपात ५१.काडीमोड ५३.कपची ५५.खट ५७.काकी ५८.सेनापती ५९.त्यागपत्र ६०.जड ६२.कालवा ६३.फटकळ ६५.मर्द ६७.भारत ६९.जप ७०.नग ७२.सर

# वारकरी संस्कारांतून घडलेले समाजभान : आपुलकी व सेवाभावाचा आदर्श रुपेश पाटील बाजड

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** रिसोड तालुक्यात आदर, विश्वास आणि आपुलकीचे प्रतीक म्हणून ओळखले जाणारे रुपेश पाटील बाजड हे व्यक्तिमत्त्व समाजसेवेचा जिवंत आदर्श ठरत आहे. रिसोड तालुक्यातील नावली या गावात जन्मलेल्या रुपेश पाटील बाजड यांच्यावर लहानपणापासूनच वारकरी संप्रदायाचे संस्कार रुजले. सेवा, साधेपणा, प्रामाणिकपणा आणि माणुसकी या मूल्यांवर आधारित जीवनप्रवास त्यांनी सातत्याने जपला आहे. परिस्थितीची जाणीव ठेवून जिद्द व मेहनतीच्या बळावर त्यांनी संघर्षातून स्वतःचे स्थान निर्माण केले.

सध्या रिसोड शहरात ते स्वतःचे मेडिकल तसेच आदर्श आपले सरकार सेवा केंद्र अत्यंत सुयोग्य, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख पद्धतीने चालवत आहेत. सेतू संदर्भातील कामकाज असो अथवा विविध शासकीय योजनांचा लाभसामान्य नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना तत्काळ मार्गदर्शन व मदत करणे हीच त्यांची कार्यपद्धती ठरली आहे. शासन व नागरिक यांच्यातील विश्वासाचा दुवा म्हणून त्यांचे कार्य उल्लेखनीय मानले जाते.

संभाजी ब्रिगेड या सामाजिक संघटनेच्या माध्यमातून त्यांनी समाजातील अन्याय, शोषण आणि विसंगतीविरोधात सातत्याने आवाज उठवला आहे. वंचित व दुर्बल घटकांच्या प्रश्नांना न्याय मिळावा यासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला. युवा पत्रकार म्हणून त्यांनी निर्भीड आणि सामाजिक बांधिलकी जपणारी पत्रकारिता केली असून, अनेक सामान्य नागरिकांचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचवून त्यावर सकारात्मक निर्णय होण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

शिवसूर्य प्रतिष्ठानच्या माध्यमातून महापुरुषांच्या जयंती शिस्तबद्ध व समाजप्रबोधनात्मक स्वरूपात साजऱ्या करण्यासाठी ते सक्रिय आहेत. रक्तदान शिबिरांचे आयोजन, स्वतः रक्तदान करून समाजाला प्रेरणा देणे, तसेच एका गरीब महिलेची हरवलेली पोथ तात्काळ परत करून माणुसकीचा परिचय देणे, अशा अनेक



सामाजिक कृती त्यांनी केल्या आहेत. समाजासाठी केलेल्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना आतापर्यंत विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. नेहरू केंद्रात कार्यरत असताना तत्कालीन जिल्हाधिकारी आदरणीय ऋषिकेश मोडक यांच्या हस्ते झालेला सन्मान हा त्यांच्या कार्याचा विशेष गौरव मानला जातो.

''मैत्री हेच सर्वस्व'' या जीवनमूल्यांवर विश्वास ठेवणारे, सर्वसामान्यांशी प्रेमाने वागणारे आणि समाजात आदराने नाव घेतले जाणारे ''आपले रुपेश'' म्हणूनच रुपेश पाटील बाजड हे नाव आज संपूर्ण रिसोड तालुका व वाशी परिसरात विश्वासाचे प्रतीक बनले आहे.

त्यांच्या वाढदिवसानिमित्त मित्रपरिवार, आप्तेष्ट, सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील सामाजिक कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## वृत्तविशेष...

### छत्रपती संभाजीराजेंना पकडून देणाऱ्या गद्दारांमध्ये अन् ठाकरे बंधूंमध्ये फरक नाही; नितेश राणेंची घणाघाती टीका

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महापालिका निवडणुकीत भाजप आणि शिवसेना शिंदे गटाचा विजय झालाय तर शिवसेना ठाकरे गट आणि मनसेचा पराभव झालाय. तसंच राज्यातील २९ महापालिकांपैकी सुमारे २५ म हापालिकांमध्ये भाजपा विजयी झाली आहे. यावरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी जोरदार हल्लाबोल केलाय. एकनाथ शिंदे जयचंद झाला नसता तर या भाजपच्या १०० पिढ्या उतरल्या असत्या तरी या मुंबईवर महाराष्ट्रद्वेष्ट्यांचा महापौर बसला नसता आणि झेंडा फडकला नसता. ज्यांनी आपल्या मराठी साम्राज्याचा जरीपटका खाली उतरवला आणि त्याच हाताने ब्रिटिशांचा युनियन जॅक शनिवारवाड्यावर फडकवला, त्या बाळाजी पंत नातू आणि जयचंद यांच्या अवलादी असल्याचा हल्लाबोल संजय राऊत यांनी केला. आता यावरून भाजप नेते आणि मंत्री नितेश राणे यांनी ठाकरेंवर जोरदार प्रहार केलाय. मंत्री नितेश राणे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना मुंबई अदानींच्याच्या घशात घालण्याला भारतीय जनता पक्षाला यश मिळाला आहे, अशी टीका शिवसेना ठाकरे गटाचे संजय राऊत यांनी केली. याबाबत विचारले असता नितेश राणे म्हणाले, चंगेज मुलतानीच्या घशात घालणं चालतं. कोण बुरखेवाली बनत असली तर चाललं असतं. पण, अदानींच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि मुंबईचा विकास होईल ते यांना चालत नाही. त्यामुळे या जिहाद्यांच्या घशात घालण्यापेक्षा जे मुंबईचा विकास करू शकतील, त्यांच्या खांद्याला खांदा लावून आम्ही काम करू, असे प्रत्युत्तर त्यांनी संजय राऊत यांना दिले.

एकनाथ शिंदे जयचंद झाला नसता तर मुंबईत भाजपचा महापौर बसला नसता, असेही संजय राऊत म्हणाले. याबाबत विचारले असता नितेश राणे म्हणाले की, हे पण तर गद्दारच आहेत ना. ज्या शिर्केने छत्रपती संभाजीराजेंची माहिती मुघलांना दिली आणि आमच्या छत्रपती संभाजीराजेंना संगमेश्वरला पकडलं. त्यांच्याम ध्ये आणि ठाकरे बंधूंमध्ये अन् त्यांच्या पिल्लावळीत काहीच फरक नाही. पाकिस्तानमध्ये बसलेल्या अब्बाची स्क्रिप्ट हे मुंबईमध्ये वाचून दाखवत होते. हिंदूंमध्ये फ ूट पाडण्यासाठीच ठाकरे बंधूंना सुपाऱ्या दिल्या होत्या. म्हणून दुसऱ्या लोकांना नाव ठेवण्यापेक्षा तुम्ही ज्यांची दाढी कुरवळत होते, त्यांना जाऊन उत्तर द्या, अशी टीका त्यांनी केलीय.

### राज्यातील २७ महापालिका जिंकू म्हणणारी भाजप फक्त ९ ठिकाणी स्वबळावर, बेडूक कितीही फुगला तरी...; सुषमा अंधारेंनी 'गावठी चाणक्य' म्हणत हिणवलं

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकांचे निकाल जाहीर होताच राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या उपनेत्या



सुषमा अंधारे यांनी सोशल मीडियाच्या म ाध्यमातून भाजप (ँव्ङ) आणि शिंदे गटावर जोरदार टीका केली आहे. त्यांनी 'शाहसेना' असा शब्दप्रयोग करत शिंदे गटावर निशाणा साधलाय. तर २९ महानगरपालिकेतील भाजपच्या कामगिरीवरही त्यांनी बोचरी टीका केली आहे.

सुषमा अंधारे यांनी 'एक्स'वर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, ''एवढ्या सगळ्या स्वायत्त यंत्रणा अधीन ठेवूनसुद्धा मुंबईत भाजपला साधं शतकही गाठता आलं नाही. कोट्यवधींचा पाऊस पाडून फक्त चार...,'' असे म्हणत त्यांनी भाजपवर निशाणा साधलाय.

भाजपचे नगरसेवक केवळ चारनेच वाढले

नगरसेवकांच्या आकडेवारीचा दाखला देत त्यांनी पुढे लिहिले आहे की, शिवसेना ठाकरे गटाकडे यापूर्वी २० ते २५ नगरसेवक होते, तर यंदा हा आकडा थेट ६५ वर पोहोचला आहे. मनसेचे सहा नगरसेवक मिळणे हा वेगळाच फायदा असल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच, ''शाहसेनेचे ५३ नगरसेवक होते, ते आता २८ वर आले आहेत. भाजपचे ८४ नगरसेवक होते, ते केवळ चारनेच वाढले आहेत,'' असे म्हणत त्यांनी शिंदे गट आणि भाजपला डिवचले आहे.

भाजपने २७ महापालिका जिंकण्याचा दावा केला होता. मात्र प्रत्यक्षात भाजप केवळ ९ ठिकाणी स्वबळावर सत्ता स्थापन करू शकली असून, १५ ठिकाणी युतीच्या 'कुबड्यावर' उभे राहण्याचा प्रयत्न करत असल्याची टीकाही सुषमा अंधारे यांनी केली आहे. पोस्टच्या शेवटी त्यांनी, ''काय भक्तुल्यानो, कळलं का? बेडूक कितीही फुगला तरी त्याचा बैल होत नाही,'' अशा उपरोधिक शब्दांत भाजपवर निशाणा साधला आहे. आता सुषमा अंधारेंच्या टीकेवर शिंदे गट आणि भाजप काय प्रतिक्रिया देणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या अनुषंगाने विविध उपक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

* हिंद दी चादर कार्यक्रमाच्या प्रचारासाठी विविध शाळा सहभागी

* वक्तृत्व स्पर्धेत कु. नियती भालेराव हिने पटकावला प्रथम क्रमांक

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** ''हिंद-दी-चादर'' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या प्रचारप्रसिद्धीसाठी नांदेड जिल्ह्यातील शाळा आज चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या उत्साही जयघोषाने दुमदुमून गेल्या. प्रभातफेऱ्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी ''हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी'' या घोषणांनी शाळा व परिसर भारावून टाकत सर्वत्र देशभक्तीमय वातावरण निर्माण केले. जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये प्रभातफेऱ्यांच्या माध्यमातून हिंद-दी-चादर कार्यक्रमाची प्रभावी प्रचारप्रसिद्धी करण्यात येत असून, या उपक्रमास विद्यार्थ्यांचा मोठ्या






उत्साहाने सहभाग लाभत आहे. या माध्यमातून कार्यक्रमाबाबत व्यापक जनजागृती होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

आज हुतात्मा जयंतराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, हिमायतनगर (जि. नांदेड) येथे हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयोजित तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा सवना (ज.) येथेही वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. येथील विद्यार्थिनी कु. नियती भालेराव हिने प्रथम क्रमांक पटकावला. तसेच नांदेड तालुका, हिमायतनगर तालुका, देगलूर तालुका आदी ठिकाणी अनेक शाळांमध्ये प्रभातफ ेरी, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. नांदेड येथे तालुकास्तरीय गायन स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले.

या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये निबंध, चित्रकला, वक्तृत्व, गायन आदी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून, श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या त्याग, बलिदान व धर्मनिष्ठेचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

### डोक्यावर प्रशांत दामलेंचा हात, सात्विकला मतदारांचे लाभले आशीर्वाद; सोलापुरातील ४ युवांचा विजय लक्षवेधी

**सोलापूर/प्रतिनिधी :** येथील महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपने (ँव्ङ) ऐतिहासिक विजय मिळवत १०२ पैकी तब्बल ८७ जागांवर एकतर्फी सत्ता मिळवली आहे. या दणदणीत यशात अनेक नवे चेहरे पुढे आले असले, तरी मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील दिग्गज कलाकारांनी जाहीर पाठिंबा दिलेल्या एका तरुण उम ेदवाराची चर्चा विशेष रंगताना पाहायला मिळते आहे. सात्विक प्रशांत बडवे असे या विजयी उमेदवाराचे नाव असून, वयाच्या अवघ्या २७ व्या वर्षी सात्विक बडवे नगरसेवक झाला आहे. सोलापूर (एदत्र्ज्ली) महापालिकेतील प्रभाग क्रमांक २१-ड मधून भाजपकडून निवडणूक लढवणाऱ्या सात्विक बडवे यांनी शिवसेना (उद्धव ठाकरे गट) चे उमेदवार भीमाशंकर म्हेत्रे यांचा पराभव केला. या निवडणुकीत सात्विक बडवे यांना ७११४ मते, तर भीम ाशंकर म्हेत्रे यांना ४६९३ मते मिळाली. २४२१ मतांच्या फरकाने सात्विक बडवे यांनी दणदणीत विजय संपादन केला. सात्विक बडवे यांच्या प्रचारासाठी म राठी कलाविश्वातील अनेक नामवंत कलाकारांनी पाठिंबा देत शुभेच्छा दिल्या शिवाय मतदानासाठी साद घातली होती.

ज्येष्ठ अभिनेते प्रशांत दामले, अलका कुबल, प्रिया बेर्डे, पंकज विष्णू, जयराज नायर, ओंकार कर्वे, शर्वरी जेमेनीस, स्वप्नील रास्ते, शंतनू गंगणे, नितीन भंजन, वैखरी भंजन-पाठक, विघ्नेश जोशी, ऐश्वर्या नारकर, प्रमोद पवार आणि टीना घई यांच्यासह अनेक कलाकारांनी सात्विकसाठी उघडपणे मतांची साद घातली होती. या कलाकारांनी केलेले आवाहनाचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले होते.

## महिलांच्या आरोग्यासाठी ऐतिहासिक पाऊल; महाराष्ट्रात देशातील पहिले 'मेनोपॉज क्लिनिक' सुरु

### धाराशिव येथे पहिल्याच दिवशी २२१ महिलांची तपासणी

दैनिक आपला विदर्भ

**धाराशिव/प्रतिनिधी :** महिलांच्या आरोग्याला केंद्रस्थानी ठेवत महाराष्ट्र राज्यात देशातील पहिले 'मेनोपॉज क्लिनिक (रजोनिवृत्ती क्लिनिक)' सुरू करण्यात आले असून,हा उपक्रम महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने ऐतिहासिक ठरत आहे.श्री प्रकाश आबिटकर,मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण,महाराष्ट्र राज्य आणि राज्यमंत्री श्रीमती मेघना बोर्डीकर यांच्या संकल्पनेतून राज्यातील सर्व शासकीय रुग्णालये तसेच शहरी भागांमध्ये हे क्लिनिक सुरू करण्यात आले आहेत.

या अभिनव उपक्रमाला राज्यभरातील महिलांकडून मोठ्या प्रमाणावर सकारात्मक प्रतिसाद मिळत असून,महिलांनी समाधान व कृतज्ञता व्यक्त केली आहे.''मेनोपॉज हा आजार नसून महिलांच्या आयुष्यातील एक नैसर्गिक टप्पा आहे.मात्र या काळात महिलांना शारीरिक व मानसिक आधाराची नितांत गरज असते.प्रत्येक महिलेला योग्य सल्ला,उपचार आणि सन्मान मिळावा,या उद्देशाने मेनोपॉज क्लिनिक सुरू करण्यात आले आहेत.असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

रजोनिवृत्ती हा महिलांच्या आयुष्यातील अत्यंत जिव्हाळ्याचा आणि संवेदनशील टप्पा असून,या काळात होणारे शारीरिक बदल, मानसिक ताण,हार्मोनल असंतुलन, हाडांचे आजार,झोपेचे विकार व नैराश्य याकडे आजवर अनेकदा दुर्लक्ष झाले होते.यामुळे महिलांना शारीरिक,मानसिक,कौटुंबिक आणि सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागत होते.या समस्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी समुपदेशन व योग्य उपचाराचा प्रभावी पर्याय शासनाने उपलब्ध करून दिल्याबद्दल समाजातून कृतज्ञता व्यक्त होत आहे.

ही गरज ओळखून श्रीमती मेघना बोर्डीकर यांनी महिलांसाठी दर बुधवारी विशेष मेनोपॉज क्लिनिक सुरू करण्याबाबत राज्यातील सर्व जिल्ह्यांतील शासकीय आरोग्य संस्थांना सूचना दिल्या.त्यानुसार जिल्ह्यात शहरी विभागातील जिल्हा रुग्णालय अंतर्गत उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालये अशा एकूण १३ आरोग्य संस्थांमध्ये,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली १४ जानेवारी २०२६ रोजी मकर संक्रांतीचे औचित्य साधून 'मेनोपॉज क्लिनिक (रजोनिवृत्ती क्लिनिक)'ची अधिकृत सुरुवात करण्यात आली.या दिवशी एकूण २२१ महिलांची तपासणी करण्यात आली.

या क्लिनिकच्या माध्यमातून महिलांना तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला, मानसिक आरोग्य समुपदेशन,हाडे, हृदय व हार्मोन तपासणी, औषधोपचार,आहार व जीवनशैलीविषयक मार्गदर्शन अशा सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येत आहेत.महत्त्वाची बाब म्हणजे,देशात प्रथमच अशा प्रकारचे मेनोपॉज क्लिनिक सुरू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे.महिलांच्या आरोग्याबाबत महाराष्ट्राने उचललेले हे पाऊल इतर राज्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. मकर संक्रांतीनिमित्त महिलांसाठी सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत असून,महिलांच्या आरोग्याची गोड भेट म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे. संवेदनशील व आरोग्यदृष्टी असलेल्या नेतृत्वाबद्दल महिलांनी श्रीमती बोर्डीकर यांचे कौतुक करत आभार व्यक्त केले आहे.''महिलांचे आरोग्य सक्षम झाले,तर कुटुंब,समाज आणि राज्य निश्चितच सक्षम होईल, ''असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. तरी जिल्ह्यातील सर्व महिलांनी आपल्या नजीकच्या शासकीय रुग्णालयात दर महिन्याच्या बुधवारी भेट देऊन 'मेनोपॉज क्लिनिक (रजोनिवृत्ती क्लिनिक)'चा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर यांनी केले आहे.

## गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त आयोजित 'हिंद दी चादर' कार्यक्रमाचा विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्याकडून आढावा

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी:** श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त आयोजित 'हिंद दी चादर' या कार्यक्रमाच्या तयारीचा विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज सविस्तर आढावा घेतला. या ऐतिहासिक व प्रेरणादायी कार्यक्रमाच्या आयोजनात कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी प्रशासनाने दक्षतेने व समन्वयाने काम करावे, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित आढावा बैठकीला दुरदृष्य प्रणालीद्वारे नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्यासह विभागातील महसूल, शिक्षण, आरोग्य, माहिती



यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. तर विभागीय आयुक्त कार्यालयात अपर आयुक्त मंजुषा मिसकर, नगर प्रशासन विभागाचे देविदास टेकाळे यांच्यासह संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते. आढावा बैठकीत कार्यक्रमाची एकूण रूपरेषा, जनजागृती उपक्रम, प्रभात फ ेऱ्या, विद्यार्थी व युवकांचा सहभाग, मुख्य सोहळ्याचे नियोजन तसेच कायदा-सुव्यवस्था, वाहतूक, सुरक्षा, स्वच्छता व आरोग्य सुविधांबाबत सविस्तर चर्चा झाली.

कार्यक्रमाच्या माध्यमातून श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या त्याग, शौर्याचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवावा, असे आवाहन आयुक्त श्री. पापळकर यांनी केले. नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही याची विशेष काळजी घेऊन कार्यक्रम शिस्तबद्ध, शांततापूर्ण व उत्साहात पार पाडावा यासाठी सूक्ष्म नियोजन करावे. तसेच सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून जबाबदारीने काम करावे, प्रत्येक विभागाने प्रचार व प्रसाराचे नियोजन करावे असे निर्देशही त्यांनी यंत्रणेला दिले. 'हिंद दी चादर' कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य, सद्भावना व ऐतिहासिक मूल्यांची जाणीव निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी ''हिंद दी चादर'' कार्यक्रमाच्या अनुषंगाने केलेल्या तयारीबाबत सविस्तर माहिती दिली.

यावेळी बैठकीस विभागातील जिल्हा प्रशासनातील अधिकारी, आरोग्य, शिक्षण यांच्यासह विविध विभागातील अधिकारी उपस्थित होते.